# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (जनसंपर्क विभाग)

**<u>प्रसिद्धी पत्रक                                    ता. ७ फेब्रुवारी २०१९</u>**

# महापौर चषक अ.भा. नृत्य स्पर्धेचे ९ ला उद्घाटन

## मनपा व कलाश्रृंगार नृत्य निकेतनचे आयोजन

**नागपूर, ता. ७ :** नागपूर महानगरपालिका व कलाश्रृंगार नृत्य निकेतन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'महापौर चषक अखिल भारतीय नृत्य स्पर्धे'चे उद्घाटन सकाळी ११ वाजता रेशीमबाग येथील कविवर्य सुरेश भट सभागृहात महापौर नंदा जिचकार यांच्या हस्ते होईल.

यावेळी सत्तापक्ष नेते संदीप जोशी, विरोधी पक्ष नेते तानाजी वनवे, क्रीडा सभापती नागेश सहारे, शिक्षण समिती सभापती प्रा. दिलीप दिवे उपस्थित राहतील.

'महापौर चषक अखिल भारतीय नृत्य स्पर्धे'मध्ये सुमारे ७०० स्पर्धक सहभागी होणार आहेत. विशेष म्हणजे स्पर्धेमध्ये दिव्यांग स्पर्धकही सहभागी होणार आहेत. अखिल भारतीय स्तरावरील नृत्य स्पर्धेचे नागपूर शहरात पहिल्यांदाच आयोजन होत असून यामुळे अनेक उदयोन्मुख व प्रतिभावंत मुले व मुलींना व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. पाच ते १०, १० ते १५ व १५ वर्षावरील अशा तीन वयोगटात ही स्पर्धा होणार असून स्पर्धेमध्ये भरतनाट्यम्, कत्थक, लोकनृत्य, उपशास्त्रीय नृत्य, समूह नृत्य आदी प्रकारांमध्ये ही स्पर्धा होईल. स्पर्धेतील विजेत्यांना रोख पारितोषिकांसह सन्मानचिन्ह प्रदान

करण्यात येईल. स्पर्धेमध्ये मध्यप्रदेश, ओरिसा, छत्तीसगढ, दिल्ली, पश्चिम बंगाल, महाराष्ट्रातील पुणे, मुंबई, जळगाव, अकोला, चंद्रपूर, औरंगाबाद, नाशिक आदी शहरातून स्पर्धक सहभागी होणार आहेत.

स्पर्धेमध्ये आई फाऊंडेशनच्या वतीने महिला सक्षमीकरणासाठी 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' या संकल्पनेवर आधारित एक विशेष नृत्य सादर करण्यात येणार आहे. या नृत्य स्पर्धेतील विजेत्यांना आई फाऊंडेशनचे अध्यक्ष व क्रीडा समिती सभापती नागेश सहारे यांच्यातर्फे पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.